सत्यमेव जयते

विधानपरिषद विनंती-अर्ज समिती
(२०१७ -२०१८)

"यवतमाळ जिल्ह्यात जलयुक्त शिवार योजनेची कामे यशस्वीरित्या राबविण्याबाबत" या विषयावरील श्री. सुभाष झांबड,वि.प.स. यांच्या विनंती अर्जावरील विधानपरिषद विनंती अर्ज समितीचा

अहवाल

(दिनांक जुलै, २०१८ रोजी विधानपरिषदेस सादर करण्यात आला.)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, नागपूर
जुलै, २०१८

विधानपरिषद विनंती- अर्ज समिती

२०१७ -२०१८

"यवतमाळ जिल्ह्यात जलयुक्त शिवार योजनेची कामे यशस्वीरित्या राबविण्याबाबत" या विषयावरील श्री. सुभाष झांबड,वि.प.स. यांच्या विनंती अर्जावरील विधानपरिषद विनंती अर्ज समितीचा

अहवाल

विनंती अर्ज समिती

(२०१७ -२०१८)

१. श्री. माणिकराव ठाकरे, माननीय उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद तथा समिती प्रमुख
२. श्री. नागोराव गाणार, वि.प.स.
३. प्रा.डॉ. तानाजी सावंत, वि.प.स.
४. श्री. नरेंद्र पाटील, वि.प.स.
५. श्री. शरद रणपिसे, वि.प.स.

विशेष निमंत्रित

*१ ॲड. रामहरी रूपनवर, वि.प.स.
*२ ॲड. हुस्नबानू खलिफे, वि.प.स.
**३ प्रा. जोगेंद्र कवाडे, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयः-

डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव
श्री. यु. के. चव्हाण, सचिव (EM)
श्री. विलास आठवले, उप सचिव
श्री. संजय कांबळे, अवर सचिव (समिती)
श्री. नितलेश भालेराव, कक्ष अधिकारी

---

*ॲड. रामहरी रूपनवर, वि.प.स. व ॲड. हुस्नबानू खलिफे,वि.प.स.यांची दिनांक ३ नोव्हेंबर, २०१७ रोजी विशेष निमंत्रित सदस्य म्हणून नामनियुक्ती करण्यात आली आहे.

**प्रा. जोगेंद्र कवाडे, वि.प.स. यांची दिनांक ३१ जानेवारी, २०१८ रोजी विशेष निमंत्रित म्हणून नामनियुक्ती करण्यात आली आहे.

विनंती अर्ज समिती

(२०१६-२०१७)

(१) श्री.माणिकराव ठाकरे, माननीय उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद तथा समिती प्रमुख
(२) * श्री. गिरीष व्यास, वि.प.स.
(३) * प्रा.डॉ. तानाजी सावंत, वि.प.स.
(४) * श्री. आनंद ठाकूर, वि.प.स.
(५) प्रा. जोगेंद्र कवाडे, वि.प.स.

विशेष निमंत्रित
श्री. कपिल पाटील, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयः-

डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव
श्री. यु. के. चव्हाण, सचिव
श्री. विलास आठवले, उप सचिव
श्री. संजय कांबळे, अवर सचिव (समिती)
श्री. नितलेश भालेराव, कक्ष अधिकारी

---

*सर्वश्री. पांडुरंग फुंडकर, प्रकाश बिनसाळे, अमरनाथ राजुरकर, वि.प.स. यांच्या रिक्त झालेल्या जागी अनुक्रमे सर्वश्री गिरीष व्यास, तानाजी सावंत, आनंद ठाकूर वि.प.स. यांची दिनांक २७ जानेवारी, २०१७ रोजी नामनियुक्ती करण्यात आली आहे.

प्रस्तावना

" यवतमाळ जिल्ह्यात जलयुक्त शिवार योजनेची कामे यशस्वीरित्या राबविण्याबाबत" या विषयावरील विनंती अर्जाची सूचना सन्माननीय सदस्य श्री. सुभाष झांबड, वि.प.स. यांनी दिनांक २ ऑगस्ट, २०१७ रोजी दिली व दिनांक १० ऑगस्ट, २०१७ रोजी प्रस्तुतचा विनंती अर्ज सन्माननीय सदस्यांनी विधानपरिषदेस सादर केला. सदर विनंती अर्ज त्याच दिवशी विनंती अर्ज समितीकडे सुपूर्द करण्यात आला. (परिशिष्ट-एक)

विनंती अर्जात उपस्थित करण्यात आलेल्या मुद्यांबाबत शासनाकडून आवश्यक ती माहिती मिळावी म्हणून उक्त विनंती अर्ज ग्रामविकास व जलसंधारण(मृद व जलसंधारण) विभागाकडे पाठविण्यात आला. या संबंधीची माहिती मृद व जलसंधारण विभागाकडून दिनांक ९ व १६ नोव्हेंबर, २०१७ व दिनांक २० नोव्हेंबर, २०१७ रोजी महसूल व वन (वने) विभागाकडून प्राप्त झाली.

समितीने विनंती-अर्जाच्या संदर्भात विनंती अर्ज सादर करणा-या मूळ विनंती अर्जदारांच्या तसेच विभागीय सचिव, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी व अन्य अधिका-यांच्या दिनांक ९ नोव्हेंबर, २०१७ व दिनांक २१ नोव्हेंबर, २०१७ रोजी साक्षी नोंदविल्या.

विनंती-अर्जासबंधी विभागाने पाठविलेली माहिती (परिशिष्ट-दोन) तसेच साक्षीच्या वेळी समितीस मिळालेली अधिक माहिती याचा सर्वंकष विचार करून समितीने अहवाल तयार केला व दिनांक १७ जुलै, २०१८ रोजीच्या बैठकीत संमत केला.

विधान भवन :
नागपूर,
दिनांक १७ जुलै,२०१८

माणिकराव ठाकरे,
उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद तथा,
समिती प्रमुख, विनंती-अर्ज समिती.

अहवाल

मी विधानपरिषद विनंती-अर्ज समितीचा समितीप्रमुख, समितीच्या वतीने हा अहवाल सादर करीत आहे.

"यवतमाळ जिल्ह्यात जलयुक्त शिवार योजनेची कामे यशस्वीरित्या राबविण्याबाबत" या विषयावरील विनंती अर्जाची सूचना सन्माननीय सदस्य श्री. सुभाष झांबड, वि.प.स. यांनी दिनांक २ ऑगस्ट, २०१७ रोजी दिली व दिनांक १० ऑगस्ट, २०१७ रोजी प्रस्तुतचा विनंती अर्ज सन्माननीय सदस्यांनी विधानपरिषदेस सादर केला. सदर विनंती अर्ज त्याच दिवशी विनंती अर्ज समितीकडे सुपूर्द करण्यात आला. (परिशिष्ट-एक)

अर्जदारांनी विनंती अर्जात नमूद केले आहे की, राज्याचा ड्रीम प्रोजेक्ट संबोधला जाणा-या या जलयुक्त शिवार योजनेच्या कामाबद्दल अनेक तक्रारी प्राप्त झाल्यानंतर खुद्द पालकमंत्री श्री. संजय राठोड यांनी नाराजी व्यक्त केली आहे. त्यामुळे या कामावर गैरप्रकाराचा जो आरोप होत आहे त्याला पुष्टी मिळते. कृषी सहसंचालकांची अमरावती विभागातील कृषीच्या अधिकारी/कर्मचारी यांच्या चमूने भेट देऊन कामाच्या तांत्रिक बाबींवर आक्षेप घेतला. या अभियांनांतर्गत बंधा-यातील गाळ काढणे, नाला खोलीकरण, सरळीकरण, रुंदीकरण व इतर अनेक कामांना मान्यता देण्यात आली आहे. राज्यात राबविल्या गेलेल्या सूक्ष्म नियोजन उपक्रमाची सुरुवात खरी झाली आहे. परंतु योग्य नियोजन नसल्याने जलयुक्त शिवार योजनेची कामे यशस्वीरित्या राबविणे शक्य होत नाही. या कामाबद्दल अनेक तक्रारी प्राप्त झाल्याकारणाने ह्या पूर्ण प्रक्रियेमध्ये सुधारणा करणे गरजेचे आहे.

समितीच्या दिनांक ९ नोव्हेंबर, २०१७ रोजीच्या बैठकीच्या वेळी ग्रामविकास व जलसंधारण (मृद व जलसंधारण) विभागाने पाठविलेल्या माहितीत (परिशिष्ट-दोन) मध्ये असे नमूद केले आहे की, सर्वांसाठी पाणी टंचाईमुक्त महाराष्ट्र २०१९ अंतर्गत टंचाई परिस्थितीवर कायमस्वरुपी मात करण्यासाठी जलयुक्त शिवार अभियान राबविण्यात येत आहे. जलयुक्त शिवार कामांची गुणवत्ता राखली जाणे व अंमलबजावणी पारदर्शक पध्दतीने करण्याबाबत समवर्ती मुल्यमापन, त्रयस्थ संस्थेमार्फत मुल्यमापन डिजीटल फोटो (GPS TAGGING) ग्रामसभेची मान्यता, अंतिम देयके अदा करताना ग्रामपंचायतींना माहिती देणे, ग्रामसभेस अवगत करणे व मान्यता घेणे, कामावर तांत्रिक नियंत्रण ठेवणे इत्यादी बाबींवर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली दर पंधरा दिवसांनी होणा-या जिल्हास्तरीय समितीमध्ये सखोल चर्चा केली जाते.

यवतमाळ जिल्ह्यात सन २०१५-१६ मध्ये ४१३ गावांमधील कामाचे समवर्ती मुल्यमापन व सामाजिक अंकेक्षण औद्योगिक प्रशिक्षण संस्था, शासकीय तंत्र निकेतन व विविध इंजिनिअरिंग कॉलेज या त्रयस्थ संस्थांमार्फत करण्यात आलेले आहे. तसेच सन २०१५-१६ मध्ये ४१३ गावांमधील १६१ गावातील ५८३ कामाचे मुल्यमापन नाबार्ड कन्सल्टन्सी सर्व्हीस प्रा. लि. पुणे या संस्थेमार्फत करण्यात आलेले असून सदर कामे ही समाधानकारक आढळून आलेली आहे. त्याचप्रमाणे सन २०१६-१७ मधील निवडलेल्या गावातील पूर्ण झालेल्या कामाचे मुल्यमापन करण्याकरीता नाबार्ड संस्थेस आदेशीत करण्यात आलेले आहे. तसेच जिल्हाधिकारी यवतमाळ यांनी स्थापन केलेल्या पथकामार्फत कामाची तपासणी करून अहवाल करण्यात आले असून केलेली कामे शासनाच्या निकषाप्रमाणे तांत्रिकदृष्ट्या दर्जेदार आढळून आली.

यवतमाळ जिल्ह्यामध्ये जलयुक्त शिवार अभियान अंतर्गत प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे दक्षता पथक तसेच विभागीय कृषि सहसंचालक, अमरावती व नागपूर यांचेमार्फत चौकशी करण्यात आलेली आहे. सदर पथकांच्या अहवालाच्या निष्कर्षाप्रमाणे तालुका दारव्हा, पुसद, घाटंजी व पांढरकवडा येथील त्रुटी आढळलेल्या कामाशी संबंधित अधिकारी/कर्मचारी यांच्यावर निलंबन, विभागीय चौकशी , प्रशासकीय व दंडात्मक कार्यवाही प्रस्तावित करण्यात आली आहे.

यवतमाळ जिल्ह्यात जलयुक्त शिवार अभियान अंतर्गत झालेल्या सर्व उपचार कामातून नव्याने ७८९३८ टी.सी.एम. पाणीसाठा निर्माण झाला असून पाणीसाठ्यातून ६७८८९ हेक्टर जादा क्षेत्रावर संरक्षित सिंचनाची सोय झाली आहे. तसेच जलयुक्त शिवार अभियान अंतर्गत झालेल्या कामामुळे भूजल पातळीवर सरासरी ०.२९ मीटरने वाढ झालेली आहे.

सन २०१५-१६ मधील रब्बी पेरणीच्या तुलनेत सन २०१६-१७ मधील रब्बी पेरणी ७८३१६ हेक्टर क्षेत्राने वाढ झालेली आहे व उन्हाळा हंगामामध्ये २४१९७ हेक्टर क्षेत्राने वाढ झालेली आहे.

मा. पालकमंत्री श्री. संजय राठोड यांची खोलीकरणासंबंधी एक तक्रार होती सदरील तक्रारीच्या अनुषंगाने विभागीय कृषि संचालकांच्या नेतृत्वाखाली एक पथक नेमण्यात आले होते त्यात पाच उपविभागीय अधिकारी (SDO) यांचा समावेश होता. सदरील प्रकरणाची तपासणी या पथकाने केलेली असून तपासणीमध्ये १० लाख

रूपयांची वसुली काढण्यात आली होती. जास्तीची कामे दाखवून बिले काढण्यात आली होती असा तपासणी पथकाने निष्कर्ष काढला होता. सबब, संबंधितांना दोषारोप पत्रे तामिल करण्यात आलेली आहेत तसेच त्यातील दोघांना निलंबित करण्यात आलेले आहे.

पांढरकवडा येथील वन विभागाच्या याबाबत काही तक्रारी होत्या सदर प्रकरणाची चौकशी जिल्हा अधीक्षक, कृषि अधिकारी, नागपूर यांच्याकडून सुरू आहे. सदर प्रकरणातील चौकशीचा अहवाल अद्याप प्राप्त झालेला नाही. सन २०१५-१६ मधील कामांचा पाणीसाठा ६०४४२ टी.सी.एम. (Thousand Cubic Meter) इतका झालेला आहे आणि सन २०१६-१७ मधील कामांचा पाणीसाठा १८२२८ टी.सी.एम. इतका झालेला आहे. सन २०१५-१६ या वर्षामध्ये २३३३८ इतकी कामे पूर्ण करण्यात आलेली आहे. तसेच सन २०१६-१७ या वर्षामध्ये ७१९० कामे पूर्ण करण्यात आलेली आहे.

या कामांच्या बाबतीत प्रथम प्रत्येक तालुक्यांमधून गावांची निवड करण्यात येते. गावाची निवड झाल्यानंतर त्या गावात शिवार फेरी घेण्यात येते. सदरील शिवार फेरीला कृषि सहायक, जलसंधारण विभागाचे कनिष्ठ अभियंता आणि सदरील कामाशी संबंधित इतर यंत्रणेचे प्रतिनिधी उपस्थित असतात तसेच गावातील प्रतिष्ठित मंडळी उपस्थित असतात. शिवार फेरी घेवून कोणत्या ठिकाणी किती कामे घ्यावयाची आहे हे निश्चित करण्यात येते. निश्चित करण्यात आलेली कामे तांत्रिक तपासणीसाठी संबंधित यंत्रणेकडे पाठविली जातात. सदरील कामाचे देयक अदा करण्याची जबाबदारी ही तालुका कृषि अधिकारी यांच्यावर आहे. सदरील कामांची ५%तपासणी तालुका कृषि अधिकारी यांनी करावयाची आहे.

समितीच्या दिनांक २१ नोव्हेंबर, २०१७ रोजीच्या बैठकीच्या ग्रामविकास व जलसंधारण (मृद व जलसंधारण) विभागाने पाठविलेल्या माहितीत (परिशिष्ट-दोन अ) मध्ये असे नमूद केले आहे की, सर्वांसाठी पाणी टंचाईमुक्त महाराष्ट्र २०१९ अंतर्गत टंचाई परिस्थितीवर कायमस्वरुपी मात करण्यासाठी जलयुक्त शिवार अभियान राबविण्यात येत आहे. जलयुक्त शिवार कामांची गुणवत्ता राखली जाणे व अंमलबजावणी पारदर्शक पध्दतीने करण्याबाबत समवर्ती मुल्यमापन, त्रयस्थ संस्थेमार्फत मुल्यमापन डिजीटल फोटो (GPS TAGGING) ग्रामसभेची मान्यता, अंतिम देयके अदा करताना ग्रामपंचायतींना माहिती देणे, ग्रामसभेस अवगत करणे व मान्यता घेणे, कामावर तांत्रिक नियंत्रण ठेवणे इत्यादी बाबीवर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली दर पंधरा दिवसांनी होणा-या जिल्हास्तरीय समितीमध्ये सखोल चर्चा करुन केली जाते.

यवतमाळ जिल्ह्यात सन २०१५-१६ मध्ये ४१३ गावांमधील २६७ कामाचे समवर्ती मुल्यमापन व सामाजिक अंकेक्षण औद्योगिक प्रशिक्षण संस्था, शासकीय तंत्र निकेतन व विविध इंजिनिअरिंग कॉलेज या त्रयस्थ संस्थामार्फत करण्यात आलेले आहे. तसेच सन २०१५-१६ मध्ये ४१३ गावांमधील १६१ गावातील ५८३ कामाचे मुल्यमापन नाबार्ड कन्सल्टन्सी सर्व्हीस प्रा. लि. पुणे या संस्थेमार्फत करण्यात आलेले असून सदर कामे ही समाधानकारक आढळून आलेली आहेत. त्याचप्रमाणे सन २०१६-१७ मधील निवडलेल्या गावातील पूर्ण झालेल्या कामांचे मुल्यमापन करण्याकरीता नाबार्ड संस्थेस आदेशीत करण्यात आलेले आहे. तसेच जिल्हाधिकारी यवतमाळ यांनी स्थापन केलेल्या पथकामार्फत कामाची तपासणी करून अहवाल करण्यात आले असून केलेली कामे शासनाच्या निकषाप्रमाणे तांत्रिकदृष्ट्या दर्जेदार आढळून आली.

यवतमाळ जिल्ह्यामध्ये जलयुक्त शिवार अभियान अंतर्गत प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे दक्षता पथक तसेच विभागीय कृषि सहसंचालक, अमरावती व नागपूर यांचेमार्फत चौकशी करण्यात आलेली आहे. सदर पथकांच्या अहवालाच्या निष्कर्षाप्रमाणे तालुका दारव्हा, पुसद, घाटंजी व पांढरकवडा येथील त्रुटी आढळलेल्या कामाशी संबंधित अधिकारी/कर्मचारी यांच्यावर निलंबन, विभागीय चौकशी , प्रशासकीय व दंडात्मक कार्यवाही प्रस्तावित करण्यात आली आहे.

यवतमाळ जिल्ह्यात जलयुक्त शिवार अभियान अंतर्गत झालेल्या सर्व उपचार कामातून नव्याने ७८९३८ टी.सी.एम. पाणीसाठा निर्माण झाला असून पाणीसाठ्यातुन ६७८८९ हेक्टर जादा क्षेत्रावर संरक्षित सिंचनाची सोय झाली आहे. तसेच जलयुक्त शिवार अभियान अंतर्गत झालेल्या कामामुळे भूजल पातळीवर सरासरी ०.२९ मीटरने वाढ झालेली आहे.

सन २०१५-१६ मधील रब्बी पेरणीच्या तुलनेत सन २०१६-१७ मधील रब्बी पेरणी ७८३१६ हेक्टर क्षेत्राने वाढ झालेली आहे व उन्हाळी हंगामामध्ये २४१९७ हेक्टर क्षेत्राने वाढ झालेली आहे.

तसेच दिनांक २१ नोव्हेंबर, २०१७ रोजी महसूल व वन (वने) विभागाने पाठविलेल्या माहितीत (परिशिष्ट- दोन ब) मध्ये नमूद केले आहे की,सर्वांसाठी पाणी टंचाईमुक्त महाराष्ट्र २०१९ अंतर्गत टंचाई परिस्थितीवर कायमस्वरूपी मात करण्यासाठी जलयुक्त शिवार अभियान योजना राबविण्यात येत आहे. सन २०१४-१५ या वर्षामध्ये वनविभागाचा या योजनेमध्ये समावेश करण्यात आलेला नव्हता, परंतु सदर योजने अंतर्गत माथा ते पायथा जल मृद संधारणाची कामे घेणे आवश्यक असल्याने जलसंधारण विभागाचे

शासन शुध्दीपत्रक जलअ-२०१४/प्र.क्र.२०३/जल-७, दिनांक २८ जानेवारी, २०१५ नुसार या योजनेमध्ये वनविभागाचा समावेश करण्यात आलेला आहे. तसेच वनविभागातील कामे करण्याकरीता १०(अ) या अभियानांतर्गत वन विभागाच्या कार्यक्षेत्रातील कामे संयुक्त वनव्यवस्थापन समिती/वन विभागामार्फत करावीत अशा स्पष्ट सूचना देण्यात आलेल्या आहेत.

यवतमाळ जिल्ह्याअंतर्गत यवतमाळ, पांढरकवडा व पुसद वनविभागामार्फत सन २०१५-१६ करीता प्रस्तावित कामाचा आराखडा जिल्हाधिकारी, यवतमाळ यांना सादर करण्यात आला व मंजूर आराखड्यानुसार यवतमाळ वनविभागात एकूण २१२ जल व मृद संधारणाच्या कामाचे पांढरकवडा, वन विभागातील एकूण ३३१ जल व मृद संधारणाच्या कामाचे व पुसद वनविभागातील एकूण १७६ जल व मृद संधारणाच्या कामाची असे एकूण ७१९ जल व मृद संधारणाच्या कामाची अंदाजपत्रके तयार करून त्यास जिल्हाधिकारी, यवतमाळ यांचेकडून प्रशासकिय मंजुरी प्रदान करण्यात आलेली आहे. सन २०१५-१६ मध्ये प्रशासकिय मंजुरी प्राप्त झालेल्या कामाची माहिती खालीलप्रमाणे आहे.—

अ.क्र.	जिल्हा	वनविभाग	एकूण प्रशासकीय मंजूरी प्राप्त कामे	ई-निविदेनुसार कामाची रक्कम (रू.लाखात)	झालेली कामे	झालेला खर्च (रू.लाखात)
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)
१	यवतमाळ	यवतमाळ	२१२	४११.९७	२१२	४११.९७
२		पांढरकवडा	३३१	७०३.०६	३३१	७०३.०६
३		पुसद	१७६	४२४.६७	१७६	४२४.६७
		एकूण :-	७१९	१५३९.७०	७१९	१५३९.७०

वरीलप्रमाणे प्रशासकीय मंजुरी ही विलंबाने प्राप्त झाल्यामुळे सन २०१५-१६ मधील कामे सन २०१६-१७ मध्ये पूर्ण करण्यात आलेली आहेत.

त्यानंतर सन २०१६-१७ मध्ये यवतमाळ वनविभागात एकूण ३४५ जल व मृद संधारणाच्या कामाचे, पांढरकवडा वनविभागातील एकूण २५१ जल व मृद संधारणाच्या कामाचे व पुसद वनविभागातील एकूण ४५३ जल व मृद जलसंधारणाच्या कामाची असे एकूण १०१९ जल व मृद संधारणाच्या कामाची अंदाजपत्रके तयार करुन त्यास

जिल्हाधिकारी, यवतमाळ यांचेकडून प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आलेली आहे. सन २०१६-१७ मध्ये प्रशासकीय मंजुरी प्राप्त झालेल्या कामाची माहिती खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	जिल्हा	वनविभाग	एकूण प्रशासकिय मंजूरी प्राप्त कामे	ई-निविदेनुसार कामाची रक्कम (रू.लाखात)	झालेली कामे	झालेला (रू. लाखात)
१	यवतमाळ	यवतमाळ	३४५	५५५.८८	३४५	१८५.५१
२		पांढरकवडा	२२१	४२५.६१	२२१	४२५.६१
३		पुसद	४५३	५१८.५९	४५३	५१८.५९
		एकूण :-	१०१९	१५००.०८	१०१९	११२९.७१

वनविभागामार्फत ई-निविदा राबवितांना विभागीय स्तरावर ई-निविदा समिती स्थापन करुन जिल्हाधिकारी यांचे आदेशानुसार कामाचे एकत्रिकरण करुन ३ लाखाच्या वरील रक्कमेच्या ई-निविदा ऑनलाईन टाकण्यात आलेल्या आहेत. सदर निविदा उपसंचालक (माहिती), विभागीय माहिती अधिकारी, अमरावती यांच्याकडे प्रसिध्दी करीता पाठविण्यात आल्यात. निविदा उघडण्याच्या प्रक्रियेमध्ये विभागीय कार्यालय स्तरावर स्थापन समिती समक्ष प्रथमतः तांत्रिक लिफाफा उघडण्यात येवून प्राप्त दस्तऐवज तपासणी करुन पात्र बिडर याचे आर्थिक लिफाफा उघडण्यात येतो व त्यानुसार सर्वात कमी दर असलेल्या बिडर यांना समितीच्या शिफारसी वरुन निविदा देण्यात आल्या आहेत. तसेच सन २०१६-१७ मधील पूर्ण करण्यात आलेल्या कामापैकी ८० टक्के कामाचे फोटोग्राफ्स जलयुक्त शिवार ॲपव्दारे MRSAC मध्ये अपलोड करण्यात आले आहेत.

वनविभागामार्फत जलयुक्त शिवार अभियान अंतर्गतची उपरोक्त कामे शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णय/सुचनाचे पालन करुन नियोजनबध्द पध्दतीने यशस्वीरित्या निर्धारित वेळेत पूर्ण केलेली आहेत. त्यामुळे पाणीटंचाईवर कायमस्वरुपी मात होऊन भुगर्भातील जलस्तराची पातळी वाढविण्यास मदत झालेली आहे.

जलयुक्त शिवार अभियानांतर्गत सन २०१६-१७ मधील जल व मृद संधारणाची कामे पूर्ण करण्याबाबत प्रगती अहवाल.

अ.	वनवृत्त	जिल्हा	वनविभाग	जलयुक्त शिवार अभियाना अंतर्गत निवड केलेली गावे	वना लगतची गावे	जिल्हा आराखडा अनुसार			साध्य						एकूण खर्च लाखात
						एकूण मंजुर कामे	कामाचे प्रकार	अधिकचरित (लाखात)	कामाचे प्रकार	पूर्ण कामे	झालेला खर्च (लाखात)	सुरु असलेली कामे	कामाचे प्रकार	झालेला खर्च (लाखात)	
१	२	३	४	५	६	७	८	९	१०	११	१२	१३	१४	१५	१६
१	यवतमाळ	यवतमाळ	यवतमाळ	४८	४२	३४१	१) पाणी साठवण तलाव-६१ २) सलग समपातळी चर-६३ ३) तलाव गाळ काढणे-४ ४) गॅबियन बंधारे-१२६ ५) वॉल खंदक-१२ ६) अनगड दगडी बांध-२६ ७)माती नाला बांध-७ ८) नाला खोलीकरण-१०	५१६.८८	१) पाणी साठवण तलाव-६० २) सलग समपातळी चर-५९ ३) तलाव गाळ काढणे-३ ४) गॅबियन बंधारे-१२६ ५) वॉल खंदक-१२ ६) अनगड दगडी बांध-२६ ७)माती नाला बांध-६ ८) नाला खोलीकरण-१०	३३८	१८५.५१	७	जल व मृद संधारणाची कामे	०	१८५.५१
२	यवतमाळ	यवतमाळ	पुसद	५४	४३	४५३	१)पाणी साठवण तलाव-६६ २)अनगड दगडी बांध-३८ ३) माती नाला बांध-१४ ४) सलग समपातळी चर-२६ ५) गॅबियन बंधारे-३१६	५१२.६८	१)पाणी साठवण तलाव-६६ २)अनगड दगडी बांध-३८ ३) माती नाला बांध-१४ ४) सलग समपातळी चर-२६ ५) गॅबियन बंधारे-३१६	४५३	५१८.५९	०		०	५१८.५९
३	यवतमाळ	यवतमाळ	वाशिम	९२	४२	२२१	१) गॅबियन बंधारे-१७ २) अनगड दगडी बांध-९९ ३) सलग समपातळी चर-४१ ४) वनराई-३४ ५) माती नाला बांध-१२ ६) नालाखोलीकरण-१०	६१२.२०	१) गॅबियन बंधारे-६१ २) अनगड दगडी बांध-१९ ३) सलग समपातळी चर-४५ ४) वनराई-३४ ५) माती नाला बांध-१२ ६) नालाखोलीकरण-५	२०६	४२५.६१	०		०	४२५.६१
	एकूण यवतमाळ जिल्हा			२२४	१२७	५०९		१७१०.४६		९१७	११२९.४१	७		०	११२९.४१

जलयुक्त शिवार अभियानांतर्गत सन २०१५-१६ मधील जल व मृद संधारणाची कामे पूर्ण करण्याबाबत प्रगती अहवाल.

अ.	तालुका	जिल्हा	गावाचे नाव	जलयुक्त शिवार अभियान अंतर्गत निवड केलेली गावे	गावे समाविष्ट गावे	जिल्हा आराखडा अनुसार			साध्य							एकूण खर्च लाखात
						एकूण मंजूर कामे	कामाचे प्रकार	अपेक्षित खर्च (लाखात)	कामाचे प्रकार	पूर्ण कामे	झालेला खर्च (लाखात)	पूर्ण करावयाची कामे	कामाचे प्रकार	झालेला खर्च (लाखात)		
१	२	३	४	५	६	७	८	९	१०	११	१२	१३	१४	१५	१६	
१	[illegible]	[illegible]	[illegible]	१५२	८१	२१२	१) अनगड दगडी तलाव-२५ २) खळा बंधारा घर-१२ ३) गॅबियन बंधारे-७७ ४) कंटूर सीसीटी-२४ ५) वनराई-७४	४११.१७	१) अनगड दगडी तलाव-२५ २) खळा बंधारा घर-१२ ३) गॅबियन बंधारे-७७ ४) कंटूर सीसीटी-२४ ५) वनराई-७४	२१२	४११.१७	०	जल व मृद संधारणाची कामे	०	४११.१७	
२	[illegible]	[illegible]	पुसद	१०९	६७	१७६	१) अनगड बांध-७५ २) गॅबियन बंधारे-२७ ३) वनराई-५ ४) माती नाला बांध-१६ ५) खळा बंधारा घर-१ ६) कंटूर सीसीटी-१ ७) Construction of water absorbing trench-४ ८) शेत बंधारा घर-१० ९) स्थानीय पाणी साठवण तलाव-१९	४४८.४१	१) अनगड बांध-७५ २) गॅबियन बंधारे-२७ ३) वनराई-५ ४) माती नाला बांध-१६ ५) खळा बंधारा घर-१ ६) कंटूर सीसीटी-१ ७) Construction of water absorbing trench-४ ८) शेत बंधारा घर-१० ९) स्थानीय पाणी साठवण तलाव-१९	१७६	४२४.७४	०		०	४२६.७७	
३			वडगवाडी	११४	५१	३३२	१) गॅबियन बंधारे-१६६ २) अनगड दगडी बांध-४८ ३) खळा बंधारा घर-४३ ४) वनराई-५० ५) नालाखोलीकरण/दुरुस्ती-२५	१२०.०४	१) गॅबियन बंधारे-१६६ २) अनगड दगडी बांध-४८ ३) खळा बंधारा घर-४३ ४) वनराई-५० ५) नालाखोलीकरण/दुरुस्ती-२५	३३२	७०३.०६	०		०	७०३.०६	
	एकूण तालुका निहाय			३९५	२०७	७२०		७८३.५४		४९२	१५३९.७७	०		०	१५३९.७७	

सर्वांसाठी पाणीटंचाईमुक्त महाराष्ट्र २०१९ अंतर्गत टंचाई परीस्थितीवर कायम स्वरूपी मात करण्यासाठी जलयुक्त शिवार अभियान राबविण्याबाबत शासनाने दिनांक ५ डिसेंबर, २०१४ रोजी शासन निर्णय निर्गमित केलेला आहे. या शासन निर्णयाचे मुख्य उद्दिष्ट हे कन्व्हर्जन्स आहे. वेगवेगळया योजना एकत्रित आणून गाव निवडून त्यामध्ये काम करणे हा त्यामागील मुख्य उद्दिष्ट आहे. मा. मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली याबाबत नियमीत बैठका होत असतात. मा. मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली असलेली उच्चस्तरीय समिती नियमीत आढावा घेत असते. विभागीय आयुक्त पातळीवरील समिती सर्व जिल्हाधिकारी रिजनल हेडसह त्याचा नियमीत पाठपुरावा घेत असतात. या समितीच्या माध्यमातुन ॲक्च्यूअल इम्प्लिमेंटेशन होत असते.

नालाखोलीकरण कामामध्ये थर्ड पार्टी कॉन्क्रीट इव्हॅल्युएशनचे अहवाल आपल्याकडे आलेले आहे. त्यामध्ये प्रत्येक ठिकाणी पाण्याचा चांगल्या प्रकारे फायदा झालेला आहे. नालाखोलीकरणाच्या कामामध्ये विहिरींना मोठ्या प्रमाणात फायदा होवून १.५ ते २ मीटर पर्यंत पाण्याच्या पातळया वाढल्या आहे.

मनरेगा ही केंद्र शासनाची योजना आहे. त्यात १००% टक्के पैकी अनस्किल कम्पोंनंट ६०% केंद्र शासन देते. स्कील्ड कम्पोंनट पैकी ७५ % केंद्र शासन आणि २५% राज्य शासन देते. याचा पूर्ण रेशियो काढला तर ९०% केद्र शासन आणि १०% राज्य शासन देते. ज्या वेळेस जलसंधारण विभागाचा सुरूवातीचा जलयुक्त शिवाराचा शासन निर्णय तयार झाला तेव्हा त्या निर्णयामध्ये वन विभागाचा समावेश केलेला नव्हता. त्यामुळे वन विभागाने जलसंधारण विभागाला विनंती केली की, जलसंधारणाचे काम हे माथा ते पायथा झाले पाहिजे. त्यामुळे त्यांनी सुधारित शासन निर्णय काढून त्यामध्ये वन विभागाचा समावेश केला. सन २०१४-१५ पासून जलयुक्त शिवाराचे काम करण्यात येत आहे. सन २०१४-१५ मध्ये जलसंधारणाची ७५ कोटी रूपयांची २४८८ कामे करण्यात आलेली आहेत. सन २०१५-१६ मध्ये २०२ कोटी रूपयांची १२७६५ कामे केलेली आहेत आणि सन २०१६-१७ मध्ये १९२ कोटी रूपये निधी खर्च करून ११६०१ कामे करण्यात आलेली आहेत. या योजनेमध्ये पाणी साठवण तलाव, तलावामधील गाळ काढणे, बंधारे खोल करणे, गॅबीयन बंधारे, खोलखंदक, अनगड दगडी बांध, मातीनाला बांध यासर्वांचा समावेश करण्यात आलेला आहे.

अभिप्राय व शिफारशी : "यवतमाळ जिल्ह्यात जलयुक्त शिवार योजनेची कामे यशस्वीरित्या राबविण्याबाबत " या विषयावरील विनंती अर्ज सन्माननीय सदस्य श्री. सुभाष झांबड, वि. प.स. यांनी दिनांक १० ऑगस्ट, २०१७ रोजी विधान परिषदेस सादर केला.

सदर विनंती अर्जात नमूद करण्यात आले आहे की, "राज्याचा ड्रिम प्रोजेक्ट संबोधला जाणा-या या जलयुक्त शिवार योजनेच्या कामाबद्दल अनेक तक्रारी प्राप्त झाल्यानंतर खुद्द पालकमंत्री यांनी नाराजी व्यक्त केली आहे. त्यामुळे या कामावर गैरप्रकाराचा जो आरोप होत आहे त्यास पुष्टी मिळते. कृषी सहसंचालक, अमरावती यांच्या नेतृत्वातील कृषी विभागाच्या अधिकारी/कर्मचारी यांच्या चमूने भेट देऊन कामाच्या तांत्रिक बाबींवर आक्षेप घेतला. या अभियानांतर्गत बंधा-यातील गाळ काढणे, नाला खोलीकरण, सरळीकरण, रूंदीकरण व इतर अनेक कामांना मान्यता देण्यात आली आहे. राज्यात राबविल्या गेलेल्या सूक्ष्म नियोजन उपक्रमाची सुरूवात झाली आहे खरी परंतु योग्य नियोजन नसल्याने जलयुक्त शिवार योजनेची कामे यशस्वीरित्या राबविणे शक्य होत नाही. या कामाबद्दल अनेक तक्रारी प्राप्त झाल्या कारणाने ह्या पूर्ण प्रक्रियेमध्ये सुधारणा करणे गरजेचे आहे. पावसाचे पाणी गाव शिवारात अडवून पाण्याची पातळी वाढविणे हा या कामामागचा मूळ उद्देश आहे. त्यामुळे पाणी टंचाईवर कायम स्वरूपी मात करण्यासोबतच सिंचन क्षेत्र वाढविण्यास देखील चांगला फायदा होणार आहे. पण ही कामे नियमानुसार होत नसतील तर पाणी टंचाईवर मात करण्याचा उद्देश कितपत सफल होईल हे सांगणे कठीण आहे." तरी यवतमाळ जिल्ह्यात जलयुक्त शिवाराच्या कामाच्या ह्या प्रक्रियेमध्ये सुधारणा करण्यात यावी अशी विनंती अर्जदारांनी केली आहे.

समितीच्या दिनांक ९ नोव्हेंबर, २०१७ रोजीच्या बैठकीच्या वेळी ग्रामविकास व जलसंधारण (मृद व जलसंधारण) विभागाने दिलेल्या माहितीत नमूद केले आहे की, सर्वांसाठी पाणी टंचाईमुक्त महाराष्ट्र २०१९ अंतर्गत टंचाई परिस्थितीवर कायमस्वरुपी मात करण्यासाठी जलयुक्त शिवार अभियान राबविण्यात येत आहे. जलयुक्त शिवार कामांची गुणवत्ता राखली जाणे व अंमलबजावणी पारदर्शक पध्दतीने करण्याबाबत समवर्ती मुल्यमापन, त्रयस्थ संस्थेमार्फत मुल्यमापन डिजीटल फोटो (GPS TAG-GING ग्रामसभेची मान्यता, अंतिम देयके अदा करताना ग्रामपंचायतींना माहिती देणे,

ग्रामसभेस अवगत करणे व मान्यता घेणे, कामावर तांत्रिक नियंत्रण ठेवणे इत्यादी बाबीवर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली दर पंधरा दिवसांनी होणा-या जिल्हास्तरीय समितीमध्ये सखोल चर्चा केली जाते. यवतमाळ जिल्ह्यात सन २०१५-१६ मध्ये ४१३ गावामधील २६७ कामाचे समवर्ती मुल्यमापन व सामाजिक अंकेक्षण औद्योगिक प्रशिक्षण संस्था, शासकीय तंत्र निकेतन व विविध इंजिनिअरिंग कॉलेज या त्रयस्थ संस्थामार्फत करण्यात आलेले आहे. तसेच सन २०१५-१६ मध्ये ४१३ गावामधील १६१ गावातील ५८३ कामाचे मुल्यमापन नाबार्ड कन्सल्टन्सी सर्व्हीस प्रा. लि. पुणे या संस्थेमार्फत करण्यात आलेले असून सदर कामे ही समाधानकारक आढळून आलेली आहे.त्याचप्रमाणे सन २०१६-१७ मधील निवडलेल्या गावातील पूर्ण झालेल्या कामाचे मुल्यमापन करण्याकरीता नाबार्ड संस्थेस आदेशीत करण्यात आलेले आहे. तसेच जिल्हाधिकारी यवतमाळ यांनी स्थापन केलेल्या पथकामार्फत कामाची तपासणी करून अहवाल करण्यात आले असून केलेली कामे शासनाच्या निकषाप्रमाणे तांत्रिक दृष्ट्या दर्जेदार आढळून आली. यवतमाळ जिल्ह्यामध्ये जलयुक्त शिवार अभियान अंतर्गत प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे दक्षता पथक तसेच विभागीय कृषि सहसंचालक, अमरावती व नागपूर यांचेमार्फत चौकशी करण्यात आलेली आहे. सदर पथकांच्या अहवालाच्या निष्कर्षाप्रमाणे तालुका दारव्हा, पुसद, घाटंजी व पांढरकवडा येथील त्रुटी आढळलेल्या कामाशी संबंधित अधिकारी/ कर्मचारी यांच्यावर निलंबन, विभागीय चौकशी , प्रशासकीय व दंडात्मक कार्यवाही प्रस्तावित करण्यात आली आहे.यवतमाळ जिल्ह्यात जलयुक्त शिवार अभियान अंतर्गत झालेल्या सर्व उपचार कामातून नव्याने ७८९३८ टी.सी.एम. पाणीसाठा निर्माण झाला असून पाणीसाठ्यातून ६७८८९ हेक्टर जादा क्षेत्रावर संरक्षित सिंचनाची सोय झाली आहे. तसेच जलयुक्त शिवार अभियान अंतर्गत झालेल्या कामामुळे भूजल पातळीवर सरासरी ०.२९ मीटरने वाढ झालेली आहे.सन २०१५-१६ मधील रब्बी पेरणीच्या तुलनेत सन २०१६-१७ मधील रब्बी पेरणी ७८३१६ हेक्टर क्षेत्राने वाढ झालेली आहे व उन्हाळा हंगामामध्ये २४१९७ हेक्टर क्षेत्राने वाढ झालेली आहे.

समितीने उक्त प्रकरणी दिनांक ९ नोव्हेंबर, २०१७ रोजी बैठक घेवून विभागीय सचिवांची साक्ष घेतली. सदर बैठकीत समितीने विचारणा केली की, यवतमाळ जिल्ह्यात जलयुक्त शिवार योजनेची कामे घेण्यात येत असून त्याबाबत शासनाकडे

किती तक्रारी आल्या आहेत यावर समितीला सांगण्यात आले की, मा. संजय राठोड,पालकमंत्री, यवतमाळ यांची खोलीकरणासंबंधी एक तक्रार होती सदरील तक्रारीच्या अनुषंगाने विभागीय कृषी सहसंचालकांच्या नेतृत्वाखाली एक पथक नेमण्यात आले होते. त्यात पाच उप विभागीय अधिकारी यांचा समावेश होता. सदरील प्रकरणाची तपासणी या पथकाने केलेली आहे. तपासणीमध्ये १० लाख रूपयांची वसुली काढण्यात आली होती. जास्तीची कामे दाखवून देयके अदा करण्यात आली होती. असा तपासणी पथकाने निष्कर्ष काढला होता. सदर पथकाने ११ ठिकाणी झालेल्या कामांची तपासणी केली होती. एकूण ३२ ठिकाणी कामे झालेली होती. त्यातील ११ ठिकाणी झालेल्या कामांची तपासणी करण्यात आलेली आहे. यामध्ये एक कृषी पर्यवेक्षक आणि दोन कृषी सहायक यांना निलंबित करण्यात आले आहे. संबंधित अधिका-यांना कृषी विभागाकडून दोषारोप पत्र तामिल करण्यात आलेले आहेत.

सदर तक्रार दारव्हा तालुक्यातील आहे. तथापि वणीचे आमदार महोदय आहेत त्यांनी तक्रारी केल्या होत्या, आर्णीचे जे आमदार महोदय आहेत त्यांनी तक्रारी केल्या होत्या समितीकडे सदर तक्रारीच्या प्रती प्राप्त झाल्या आहेत. काहीही काम न करता पैसे उचलून घेतल्या प्रकरणी तक्रारी करण्यात आलेल्या आहेत. पांढरकवडा येथे सुध्दा अशाच तक्रारी करण्यात आल्या आहेत. इतर लोकांनी सुध्दा खूप तक्रारी केलेल्या आहेत. सदर तक्रारींची दखल तरी घेण्यात आली आहे काय याबाबत समितीने विचारणा केली असता विभागाकडून सांगण्यात आले की, सर्व कामांचे त्रयस्थ संस्थेमार्फत मूल्यमापन करून घेण्यात आलेले आहे. जलयुक्त शिवार योजनेमध्ये काम पूर्ण झाल्यानंतर नियमितपणे मुल्यमापन करण्यात येत असते.

राज्यात किती कामे पूर्ण झाली असून त्यामध्ये किती पाणीसाठा झाला आहे याबाबत समितीने विचारणा केली असता सन २०१५-१६ या वर्षामध्ये २३,३३८ इतकी कामे पूर्ण करण्यात आली असून ६०,४४२ टी.सी.एम. झालेला आहे आणि सन २०१६-१७ मध्ये ७,१९० कामे पूर्ण झाली असून पाणीसाठा २१,१९३ टी. सी. एम. इतका झाला असल्याचे विभागाने नमूद केले आहे.

जलयुक्त शिवार योजनेच्या कामांना जसे की, नाला खोलीकरणाचे काम त्यासाठी तांत्रिक मान्यता उप विभागीय अधिकारी देत असतो. दारव्हा तालुक्यातील कामाबाबतच्या

प्रस्तावाला तांत्रिक मान्यता दिली असून सदर प्रस्ताव कृषी विभागाने शासनाला पाठविलेला आहे. चौकशीच्या संदर्भाने उपविभागीय अधिकारी आणि तालुका कृषी अधिकारी यांना दोषारोप पत्र कृषी विभागाकडून तामिल करण्यात आलेले आहेत. उक्त प्रकरणी खोलीकरणाबाबतच्या ज्या मार्गदर्शक सूचना आहेत त्यामध्ये खडकापर्यंतच खोलीकरण करण्यात यावे अशा सूचना आहेत. तथापि सदर कामाच्या बाबतीत A3 आणि A4 यासाठी सुध्दा मान्यता दिली असल्याचे दिसते. दारव्हा या तालुक्यामध्ये खडक फोडल्याचे आढळून आलेले आहे आणि या कारणामुळे संबंधिताना निलंबीत करण्यात आले असल्याचे विभागाचे मत आहे. तथापि खडक न फोडता खडक फोडल्याचे देयक दाखविण्यात आल्याबाबतची तक्रार समितीकडे प्राप्त आहे.

याबाबत समितीचे मत असे आहे की, खोदकाम करताना दगड काढले ही चूक समजण्यात आली आहे तथापि दगडाचे लेअर ओपन झाल्याशिवाय जर पाणी झिरपत नसेल तर हे चूक की बरोबर कशावरून ठरविण्यात आले आहे याचा बोध समितीला होत नाही. काही ठिकाणी रेतीच्या लेअर आहे, मुरमाचा लेअर आहे आणि सॉफ्ट दगडाचाही लेअर आहे लेअर ओपन केले आणि त्यामध्ये कितीही प्रेशरने पाणी भरले तर ते पर्क्युलेट होईल. मात्र लेअरच ओपन झाले नाही तर पर्क्युलेशन होणार नाही. अशा परिस्थितीत फक्त दोन किंवा सहा फुटापर्यंत खोदकाम करा, हे कोणत्या आधारावर सांगण्यात आले आहे हे समजु शकले नाही. तसेच सदर कारवाई चुकीची झाल्याचे दिसते. त्यामुळे **याबाबत समिती अशी शिफारस करते की, ज्या कर्मचा-यांनी व अधिका-यांनी जेवढे खोदले पाहिजे होते त्यापेक्षा जास्त खोदले त्यांच्यावर कारवाई करण्यात येवू नये तसेच ज्यानी खोदलेच नाही व त्यांना देयके अदा केली आहेत त्यांच्यावर दोषारोप पत्र सादर करण्यापेक्षा फौजदारी गुन्हे दाखल करण्याची कारवाई करण्यात यावी व केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला दोन महिन्यात सादर करण्यात यावा.**

यवतमाळ जिल्ह्यातील जलयुक्त शिवार योजनेसंदर्भातील हा विषय आहे. येथील जलयुक्त शिवाराची कामे नियमाला धरून किंवा त्याची उपयुक्तता भविष्यामध्ये व्हावी या दृष्टिकोनातून झालेली नाहीत. मा. मुख्यमंत्री यांनी सांगितले आहे की, भविष्यामध्ये दुष्काळ निवारण करण्याच्या दृष्टिकोनातून जलयुक्त शिवार हा प्रकल्प महत्वाचा आहे. या बाबीकडे लक्ष दिले गेले पाहिजे. अशी समितीची अपेक्षा आहे. सर्व राज्यभर

खोदकाम बांदबंदिस्ती करून पाणीसाठे उपलब्ध करून घ्यायचे आणि पर्क्युलेट करून सिंचनाची व्यवस्था करायची हा त्यामागचा दृष्टिकोन होता. हेच डोळ्यासमोर ठेवून शासनाने जलयुक्त शिवार योजना जाहिर केलेली आहे. ही योजना जाहिर केल्यानंतर प्रत्यक्षपणे कितीही पाणी थांबलेले असले तरी पाणी थांबणे म्हणजे पाणी जमिनीत मुरणे असा त्याचा अर्थ होत नाही. पर्क्युलेट होण्याच्या दृष्टिकोनातून पावले ज्या पध्दतीने उचलली गेली पाहिजे याबाबत तांत्रिक दृष्ट्या तपासणी व्हायला पाहिजे खोदकाम करणे, आवश्यक त्या मार्गदर्शनाप्रमाणे काम करणे आवश्यक आहे. परंतु या कामामध्ये कोणत्याही प्रकारचा समन्वय दिसत नाही. जलयुक्त शिवार योजनेच्या कामांमध्ये समन्वय असणे गरजेचे आहे. यवतमाळ जिल्हयात निविदा पध्दतीने जी कामे झाली त्यामध्ये गैरप्रकार झालेला आहे. ज्या ज्या ठिकाणी तपासणी केली त्या प्रत्येक ठिकाणी गैरप्रकार झाल्याचे अधिका-यांच्या लक्षात आले. त्या ठिकाणच्या समितीने अशा प्रकारचे अहवाल दिले आहेत संबंधित विभागांची आपसामध्ये समन्वये साधून योग्य मार्गाने दिशा देणे गरजेचे आहे.

जीएसडीच्या आधारावर सॅटेलाईट आता नवीन पध्दतीने सर्व्हे करून घेतलेला आहे. त्या आधारावर त्याची खोली कमी जास्त करावी या संदर्भात डायरेक्शन स्पष्ट आहेत. या वर्षीपर्यंत हा डाटा विभागाने कधीही लक्षात घेतलेला नाही. सन २०१३ मध्ये शासन निर्णय निघाला की, तीन मीटरपेक्षा खोल जाऊ नये तथापि या डाटाप्रमाणे आणखी खोल जाता येते हे डायरेक्शन आहे. यावर विभागाचे मत असे आहे की, जीएसडीए कडून जे रिपोर्ट आणि जे काही डायरेक्शन्स मिळालेले आहेत त्या आधारावर खोल किंवा पुढे जाता येईल.

जलयुक्त शिवार योजनेच्या पाठीमागचा उद्देश लक्षात घ्यायला पाहिजे त्याबाबतचे तंत्रज्ञान असे की, पाणी साचल्यानंतर पाण्याचे प्रेशर तेथे असलेले सॉइल त्याच्यामुळे पाणी झिरपू शकते का, किती लांब पर्यंत त्या ठिकाणी लेयर आहे तो डाटा आहे त्या संदर्भातील मेजरमेंट झाल्यानंतर तेथे खोदकाम केले गेले पाहिजे व तेच आतापर्यंत झाले नाही. त्यामुळे याची शाश्वती देता येत नाही की, इतक्या मीटरपर्यंत पाणी झिरपून या विहिरींना किंवा आजूबाजूच्या परिसरामध्ये पाण्याची उपलब्धता होईल. इतकेच नव्हे तर ज्या ज्या ठिकाणी खोदकाम करण्यात आले आहे त्या ठिकाणी कोणाचीही तांत्रिकदृष्ट्या परवानगी घेतलेली नाही तेथे खोदकाम करण्यास सुरूवात

केल्यानंतर तांत्रिक परवानगी दिलेली आहे. हे क्वचितच योग्य नाही त्यामुळे याबाबत समिती तीव्र नाराजी व्यक्त करते.

शासनाने जलयुक्त शिवार हा कार्यक्रम एवढ्या मोठ्या प्रमाणात सुरू केलेला आहे आणि त्यामध्ये आपण हजारो कोटी रूपये टाकत आहेत. हे शास्त्रशुध्द पध्दतीने केले जात नाही म्हणून बराचसा पैसा वाया जात आहे. तांत्रिकदृष्ट्या हे काम बरोबर करणे हा त्यामागचा उद्देश आहे. परंतु ते होत नाही.

जलयुक्त शिवार योजनेच्या कामामध्ये आतापर्यंत जी. एस. डी. एस. च्या प्रमाणपत्राचा वापर कुठेही झालेला नाही. रेती व मुरूम लागेपर्यंत खोल खोदा अशा प्रकारच्या दिशा दिल्या असत्या तर त्याचे परिणाम अधिक चांगले झाले असते तथापि तसे न करता सरसकट जिथे वाटेल तिथे खोदकाम करून डबके साचून ठेवले तर त्याचा काही फायदा होणार नाही. जलयुक्त शिवार ज्या पोटतिडकीने राबवायला पाहिजे तसे ते राबविले जात नाही. त्यामुळे या योजनेचा उद्देश साध्य होत नाही. **त्यामुळे समिती अशी शिफारस करते की, या योजनेच्या निधीचा सदुपयोग होण्यासाठी जलयुक्त शिवार योजनेसाठी तांत्रिक बाबी जी.एस.डी. यांच्याकडून तपासून घेण्यात याव्यात. तांत्रिक मार्गदर्शन न घेता वारेमाप निधी देण्यात येतो यावर नियंत्रण ठेवण्याच्या दृष्टीने घेण्यात येणा-या कामांना योग्य दिशा देण्याचे काम विभागाने करावे. केंद्र शासनाकडून सदर योजनेसाठी इतर राज्यांच्या तुलनेत निधी कमी मिळतो. सदर निधीत वाढ होण्याच्या दृष्टीने केंद्राकडे पाठपुरावा करावा तसेच रोजगार हमी योजनेमधून जो निधी जलसंधारणाच्या कामावर खर्च केला जातो त्या निधी मध्येही वाढ करण्याबाबत केंद्रशासनाकडे पाठपुरावा करण्यात यावा. सदर योजनेसाठीच्या निधीचा वापर शास्त्रशुध्द पध्दतीने करण्यासाठी योग्य त्या सूचना संबंधिताना देण्यात याव्यात या कामामध्ये मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार, गैरप्रकार होत आहेत. त्यामुळे अशा कामांच्या संदर्भात अनेक तक्रारी शासनाकडे आल्या आहेत. सदर तक्रारींची चौकशी करून लवकरात लवकर संबंधित दोषी व्यक्तींविरूध्द कारवाई करावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यात देण्यात यावी.**

परिशिष्ट एक

मूळ विनंती अर्ज

परिशिष्ट – ब

सुभाष झांबड,
वि.प.स.

महाराष्ट्र विधानपरिषद
प्रति :

मा. सभापती,
महाराष्ट्र विधानपरिषद,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई-४०० ०३२.

विषय :- पैठणखाळ जिल्ह्यात जलयुक्त शिवाराची कामे घेण्यात येत असून त्याबाबत शासनाकडे अनेक तक्रारी प्राप्त झाल्यानंतर ह्या प्रक्रियेमध्ये सुधारणा करण्याबाबत.

मा. महोदय,

" राज्याचा ड्रिम प्रोजेक्ट संबोधला जाणाऱ्या या जलयुक्त शिवार योजनेच्या कामाबद्दल अनेक तक्रारी प्राप्त झाल्यानंतर खुद्द पालकमंत्री संजय राठोड यांनी नाराजी व्यक्त केली आहे. त्यामुळे या कामावर गैरप्रकाराचा जो आरोप होत आहे त्या पुष्टी मिळते. कृषी खातेसंचालकांची अमरावती विभागातील कृषीच्या अधिकारी/कर्मचारी यांच्या चमूने भेट देऊन कामाच्या तांत्रिक बाबींवर आक्षेप घेतला. या अभियानांतर्गत बंधाऱ्यातील गाळ काढणे, नाला खोलीकरण, सरळीकरण, रुंदीकरण व इतर अनेक कामांना मान्यता देण्यात आली आहे. राज्यात राबविल्या गेलेल्या सूक्ष्म नियोजन उपक्रमाची सुरुवात खरी झाली आहे. परंतु योग्य नियोजन नसल्याने जलयुक्त शिवार योजनेची कामे यशस्वीरित्या राबविणे शक्य होत नाही. याकामाबद्दल अनेक तक्रारी प्राप्त झाल्या कारणाने ह्या पूर्ण प्रक्रियेमध्ये सुधारणा करणे गरजेचे आहे.

यासंदर्भात आपणास विनंती आहे की, **सदरचा अर्ज विनंती अर्ज समितीकडे आपल्या शिफारशीसह पाठवण्यात यावा, ही विनंती.**

आपला,

(सुभाष झांबड)
वि.प.स.

सभापती
महाराष्ट्र विधानपरिषद

विनंती अर्ज समिती

दि. 2 जुलै 2017

प्रति :

मा. सुभाष सोबत,
वि.प.स.
मुंबई.

विषय :- यवतमाळ जिल्ह्यात जलयुक्त शिवाराची कामे घेण्यात येत असून त्याबाबत शासनाकडे अनेक तक्रारी प्राप्त झाल्यानंतर या प्रक्रियेमध्ये सुधारणा करण्याबाबत.

मा. महोदय,

" राज्याचा ड्रिम प्रोजेक्ट संबोधला जाणाऱ्या या जलयुक्त शिवार योजनेच्या कामाबद्दल अनेक तक्रारी प्राप्त झाल्यानंतर खुद्द पालकमंत्री संजय राठोड यांनी नाराजी व्यक्त केली आहे. त्यामुळे या कामावर गैरप्रकाराचा जो आरोप होत आहे त्या पुष्टी मिळते. कृषी सहसंचालकांची अमरावती विभागातील कृषीच्या अधिकारी/कर्मचारी यांच्या चमूने भेट देऊन कामाच्या तांत्रिक बाबीवर आक्षेप घेतला. या अभियानांतर्गत बंधाऱ्यातील गाळ काढणे, नाला खोलीकरण, सरळीकरण, रुंदीकरण व इतर अनेक कामांना मान्यता देण्यात आली आहे. राज्यात राबविल्या गेलेल्या सूक्ष्म नियोजन उपक्रमाची सुरुवात खरी झाली आहे. परंतु योग्य नियोजन नसल्याने जलयुक्त शिवार योजनेची कामे यशस्वीरित्या राबविणे शक्य होत नाही. याकामाबद्दल अनेक तक्रारी प्राप्त झाल्या कारणाने या पूर्ण प्रक्रियेमध्ये सुधारणा करणे गरजेचे आहे. पावसाचे पाणी शिवशिवारात अडवून पाण्याची पातळी वाढविणे हा या कामामागचा मुळे उद्देश आहे. त्यामुळे पाणीटंचाईवर कायम स्वरुपी मात करण्यासोबतच सिंचन क्षेत्र वाढविण्यास देखील चांगला फायदा होणार आहे. परंतु ही कामे जर नियमानुसार होत नसेल तर पाणीटंचाईवर मात करण्याचा उदेश कितपत सफल होईल हे सांगणे कठीण आहे.

करिता आपणास विनंती आहे की, **यवतमाळ जिल्ह्यात जलयुक्त शिवाराची कामाच्या या प्रक्रियेमध्ये सुधारणा करण्यात यावी, ही विनंती.**

आपले,

	नाव	गाव	तालुका	मो. नंबर
१)	अनिल देविदासराव गायकवाड		12 महारोड नगर	9850153346
२)	नितीन शंकर गुघाणे	नेरफळ	नेरफळ	9881623450
३)	विजय प्रभाकरराव काळे	यवतमाळ		9822223330
४)	दिनेश म. गोवारकर	यवतमाळ		9822625685
५)	शकुंतला पंढरीनाथ शाकुत	यवतमाळ		9422166503
६)	श्यामली चुनिलाल चेडे	यवतमाळ	(Z.P. member)	9764602121

सुभाष झांबड,
वि.प.स.

महाराष्ट्र विधानपरिषद

दिनांक 27-7-2017
वेळ 4.16 pm

प्रति,

प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई.

विषय :- "औचित्याचा मुद्दा" सभागृहात उपस्थित करण्याकरिता परवानगी मिळणेबाबत.

महोदय,

मी, खालील सार्वजनिक महत्वाच्या बाबीवर "औचित्याचा मुद्दा" सभागृहात उपस्थित करू इच्छितो, कृपया परवानगी मिळावी, ही विनंती.

" राज्याचा ड्रिम प्रोजेक्ट संबोधला जाणाऱ्या या जलयुक्त शिवार योजनेच्या कामाबद्दल अनेक तक्रारी प्राप्त झाल्यानंतर खुद पालकमंत्री संजय राठोड यांनी नाराजी व्यक्त केली असणे, त्यामुळे या कामावर गैरप्रकाराचा जो आरोप होत आहे त्या पुष्टी मिळत असणे, कृषी सहसंचालकांची अमरावती विभागातील कृषीच्या अधिकारी/कर्मचारी यांच्या चमूने भेट देऊन कामाच्या तांत्रिक बाबींवर आक्षेप घेतला असणे, या अभियानांतर्गत बंधाऱ्यातील गाळ काढणे, नाला खोलीकरण, सरळीकरण, रुंदीकरण व इतर अनेक कामांना मान्यता देण्यात आली असणे, राज्यात राबविल्या गेलेल्या सूक्ष्म नियोजन उपक्रमाची सुरुवात खरी झाली असणे, परंतु योग्य नियोजन नसल्याने जलयुक्त शिवार योजनेची कामे यशस्वीरित्या राबविणे शक्य होत नसणे, बांधकामाबद्दल अनेक तक्रारी प्राप्त झाल्या कारणाने ह्या पूर्ण प्रक्रियेमध्ये सुधारणा करणे गरजेचे असणे, पावसाचे पाणी गावशिवारात अडवून पाण्याची पातळी वाढविणे हा या कामामागचा मुळे उद्देश असणे, त्यामुळे पाणीटंचाईवर कायम स्वरुपी मात करण्यासोबतच सिंचन क्षेत्र वाढविण्यास देखील चांगला फायदा होणार असणे, परंतु ही कामे जर नियमानुसार होत नसेल तर पाणीटंचाईवर मात करण्याचा उद्देश कितपत सफल होईल हे सांगणे कठीण असणे, **सबबमाळ जिल्ह्यात जलयुक्त शिवाराच्या कामाच्या ह्या प्रक्रियेत सुधारणा करण्यात यावे असे मी, या औचित्याच्या मुद्याद्वारे करीत आहे. "**

आपला,

(सुभाष झांबड)

परिशिष्ट दोन

विभागाने सादर केलेली माहिती

परिशिष्ट-दोन

विनंती अर्ज समितीची बैठक

दिनांक - ९/११/२०१७ वेळ - दुपारी १२.०० स्थळ- विधानभवन, मुंबई

विषय :- "यवतमाळ जिल्हयात जलयुक्त शिवार योजनेची कामे यशस्वीरित्या राबविण्याबाबत" या विषयी श्री.सुभाष झांबड मा.वि.प.स. यांचा विनंती अर्ज.

.....

श्री.सुभाष झांबड मा.वि.प.स.यांनी उपस्थित केलेल्या विनंती अर्जातील मुद्दा खालीलप्रमाणे आहे :-

"राज्याचा ड्रिम प्रोजेक्ट संबोधल्या जाणा-या जलयुक्त शिवार योजनेच्या कामाबद्दल अनेक तक्रारी प्राप्त झाल्यानंतर यवतमाळ जिल्हयाचे पालकमंत्री माननीय श्री. संजय राठोड यांनी नाराजी व्यक्त केली आहे. त्यामुळे या कामावर गैरप्रकाराचा जो आरोप होत आहे त्या पुष्टी मिळते. कृषी सहसंचालकांची अमरावती विभागातील कृषीच्या अधिकारी/ कर्मचारी यांच्या चमूने भेट देऊन कामाच्या तांत्रिक बाबींवर आक्षेप घेतला. या अभियानांतर्गत बंधा-यातील गाळ काढणे, नाला खोलीकरण, सरळीकरण, रुंदीकरण व इतर अनेक कामांना मान्यता देण्यात आली आहे. राज्यात राबविलेल्या गेलेल्या सूक्ष्म नियोजन उपक्रमाची सुरवात खरी झाली आहे. परंतु योग्य नियोजन नसल्याने जलयुक्त शिवार योजनेची कामे यशस्वीरित्या राबविणे शक्य होत नाही. याकामाबद्दल अनेक तक्रारी प्राप्त झाल्या कारणाने ह्या पूर्ण प्रक्रियेमध्ये सुधारणा करणे गरजेचे आहे."

उपरोक्त विनंती अर्जाच्या अनुषंगाने मृद व जलसंधारण विभागाद्वारे खालीलप्रमाणे टिप्पणी/माहीती देण्यात येत आहे :-

- सर्वांसाठी पाणी टंचाईमुक्त महाराष्ट्र २०१९ अंतर्गत टंचाई परिस्थितीवर कायमस्वरुपी मात करण्यासाठी जलयुक्त शिवार अभियान राबविण्यात येत आहे. जलयुक्त शिवार कामांची गुणवत्ता राखली जाणे व अंमलबजावणी पारदर्शक पध्दतीने करण्याबाबत समवर्ती मुल्यमापन, त्रयस्थ संस्थेमार्फत मुल्यमापन डिजीट
- ल फोटो (GPS TAGGING) ग्राम सभेची मान्यता, अंतिम देयके अदा करताना ग्रामपंचायतींना माहिती देणे, ग्रामसभेस अवगत करणे व मान्यता घेणे, कामावर तांत्रिक नियंत्रण ठेवणे इत्यादी बाबीवर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली दर पंधरा दिवसांनी होणाऱ्या जिल्हास्तरीय समितीमध्ये सखोल चर्चा करुन केली जाते.

- यवतमाळ जिल्ह्यात सन २०१५-१६ मध्ये ४१३ गावामधील २५७ कामाचे समवर्ती मुल्यमापन व सामाजिक अंकेक्षण औद्योगिक प्रशिक्षण संस्था, शासकीय तंत्र निकेतन व विविध इंजिनिअरिंग कॉलेज या त्रयस्थ संस्थामार्फत करण्यात आलेले आहे. तसेच सन २०१५-१६ मध्ये ४१३ गावामधील १६१ गावातील ५८३ कामाचे मुल्यमापन नाबार्ड कन्सल्टन्सी सर्व्हीस प्रा.लि.पुणे या संस्थेमार्फत करण्यात आलेले असून सदर कामे ही समाधानकारक आढळून आलेली आहे. त्याचप्रमाणे सन २०१६-१७ मधील निवडलेल्या गावातील पूर्ण झालेल्या कामाचे मुल्यमापन करण्याकरीता नाबार्ड संस्थेस आदेशीत करण्यात आलेले आहे. तसेच जिल्हाधिकारी यवतमाळ यांनी स्थापन केलेल्या पथकामार्फत कामाची तपासणी करून अहवाल सादर करण्यात आले असून केलेली कामे शासनाच्या निकषाप्रमाणे तांत्रिक दृष्टया दर्जेदार आढळून आली.
- यवतमाळ जिल्ह्यामध्ये जलयुक्त शिवार अभियान अंतर्गत प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य पुणे यांचे दक्षता पथक तसेच विभागीय कृषि सहसंचालक, अमरावती व नागपूर यांचेमार्फत चौकशी करण्यात आलेली आहे. सदर पथकांच्या अहवालाच्या निष्कर्षाप्रमाणे तालुका दारव्हा, पुसद, घाटंजी व पांढरकवडा येथील त्रुटी आढळलेल्या कामाशी संबंधित अधिकारी/कर्मचारी यांच्यावर निलंबन, विभागीय चौकशी, प्रशासकीय व दंडात्मक कार्यवाही प्रस्तावित करण्यात आली आहे.
- यवतमाळ जिल्ह्यात जलयुक्त शिवार अभियान अंतर्गत झालेल्या सर्व उपचार कामातून नव्याने ७८९३८ टी.सी.एम. पाणीसाठा निर्माण झाला असून पाणीसाठ्यातून ६७८८९ हेक्टर जादा क्षेत्रावर संरक्षित सिंचनाची सोय झाली आहे. तसेच जलयुक्त शिवार अभियान अंतर्गत झालेल्या कामामुळे भूजल पातळीत सरासरी ०.२९ मीटरने वाढ झालेली आहे.
- सन २०१५-१६ मधील रब्बी पेरणीच्या तुलनेत सन २०१६-१७ मधील रब्बी पेरणी ७८३१६ हेक्टर क्षेत्राने वाढ झालेली आहे व उन्हाळी हंगामामध्ये २४१९७ हेक्टर क्षेत्राने वाढ झालेली आहे.

.....

परिशिष्ट दोन-अ

महाराष्ट्र शासन

दूरध्वनी क्र. : २२७९३१०१ २२८४६९७४/
Email: jalseven.wc@gmail.com

क्रमांक : विनंती-२०१७/प्र.क्र.५३४/जल-७
मृद व जलसंधारण विभाग,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक: १६ नोव्हेंबर, २०१७

प्रति,

उप सचिव (ड-१५),
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधानभवन, मुंबई

विषय :"यवतमाळ जिल्ह्यात जलयुक्त शिवार योजनेची कामे यशस्वीरित्या राबविण्याबाबत" या विषयी विनंती अर्ज.

संदर्भ : १. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाचे पत्र क्र.२९०१२/ड-१५, दि.०९/११/२०१७
२. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाचे पत्र क्र.३००७७/म.वि.स./विधिकिअस/ड-१५ दि.१६/११/२०१७

महोदय,

उपरोक्त विषयी संदर्भाधीन पत्राच्या अनुषंगाने महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या विनंती अर्ज समितीस प्राप्त झालेल्या विनंती अर्जातील मुद्यांच्या अनुषंगाने अद्ययावत माहितीच्या ४० प्रती सोबत जोडून पाठविण्यात येत आहेत.

आपला,

(ना.श्री .कराड)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत-

१. कक्ष अधिकारी, जल- २४
२. कार्यासन जल - ७ संग्रहार्थ

विनंती अर्ज समितीची बैठक

दिनांक - २९/११/२०१७ वेळ - दुपारी ३.०० स्थळ- विधानभवन, मुंबई

विषय :- "यवतमाळ जिल्हयात जलयुक्त शिवार योजनेची कामे यशस्वीरित्या राबविण्याबाबत" या विषयी श्री.सुभाष झांबड मा.वि.प.स. यांचा विनंती अर्ज.

***

- यवतमाळ जिल्ह्यात सन २०१५-१६ मध्ये ४१३ गावामधील २६७ कामाचे समवर्ती मुल्यमापन व सामाजिक अंकेक्षण औद्योगिक प्रशिक्षण संस्था, शासकीय तंत्र निकेतन व विविध इंजिनिअरिंग कॉलेज या त्रयस्थ संस्थांमार्फत करण्यात आलेले आहे. तसेच सन २०१५-१६ मध्ये ४१३ गावापैकी १६१ गावातील ५८३ कामाचे मुल्यमापन नाबार्ड कन्सल्टन्सी सर्व्हीस प्रा.लि.पुणे या संस्थेमार्फत करण्यात आलेले असून सदर कामे ही समाधानकारक आढळून आलेली आहे. त्याचप्रमाणे सन २०१६-१७ मधील निवडलेल्या गावातील पूर्ण झालेल्या कामाचे मुल्यमापन करण्याकरीता नाबार्ड संस्थेस आदेशीत करण्यात आलेले आहे. तसेच जिल्हाधिकारी यवतमाळ यांनी स्थापन केलेल्या पथकामार्फत कामाची तपासणी करून अहवाल सादर करण्यात आले असून केलेली कामे शासनाच्या निकषाप्रमाणे तांत्रिक दृष्टया दर्जेदार आढळून आली.
- यवतमाळ जिल्हयामध्ये जलयुक्त शिवार अभियान अंतर्गत प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य पुणे यांचे दक्षता पथक तसेच विभागीय कृषि सहसंचालक, अमरावती व नागपूर यांचेमार्फत चौकशी करण्यात आलेली आहे. सदर पथकांच्या अहवालाच्या निष्कर्षाप्रमाणे तालुका दारव्हा, पुसद, घाटंजी व पांढरकवडा येथील त्रुटी आढळलेल्या कामाशी संबंधित अधिकारी/कर्मचारी यांच्यावर निलंबन, विभागीय चौकशी, प्रशासकीय व दंडात्मक कार्यवाही प्रस्तावित करण्यात आली आहे.
- यवतमाळ जिल्हयात जलयुक्त शिवार अभियान अंतर्गत झालेल्या सर्व उपचार कामातून नव्याने ७८९३८ टी.सी.एम. पाणीसाठा निर्माण झाला असून पाणीसाठयातून ६७८८९ हेक्टर जादा क्षेत्रावर संरक्षित सिंचनाची सोय झाली आहे. तसेच जलयुक्त शिवार अभियान अंतर्गत झालेल्या कामामुळे भूजल पातळीत सरासरी ०.२९ मीटरने वाढ झालेली आहे.

सन २०१५-१६ मधील रब्बी पेरणीच्या तुलनेत सन २०१६-१७ मधील रब्बी पेरणी ७८३१६ हेक्टर क्षेत्राने वाढ झालेली आहे व उन्हाळी हंगामामध्ये २४१९७ हेक्टर क्षेत्राने वाढ झालेली आहे.

.....

Scan करणे

महाराष्ट्र शासन

क्रमांक एफडीएम-२०१७/प्र.क्र.१६५/फ-२
महसूल व वन विभाग,
मादाम कामा रोड,हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई.
दिनांक २०/११/२०१७.

प्रति,
उप सचिव (ड-१५)
महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय,
मुंबई-३२

विषय :- विधानपरिषद विनंती अर्ज समितीची बैठक (दि.२१.११.२०१७, दु.०३.०० वा.)
"पयानगड जिल्हात जलयुक्त शिवार योजनेची कामे वनखात्यातर्फे राबविण्याबाबत" या विषयावरील श्री.सुभाष झांबड (वि.प.स.) यांचा विनंती अर्ज.

संदर्भ :- उप सचिव, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय यांचे पत्र क्र.३००७८/म.वि.स./विपविअस/ड-१५, दि.१६.११.२०१७

उपरोक्त विषयांकरीता प्रकरणी सचिव (वने) यांच्या साक्षीच्या अनुषंगाने अद्ययावत माहितीच्या ४० प्रती सोबत जोडल्या आहेत.

(अतुल कोतेर)
सह सचिव
महसूल व वन विभाग

सोबत:- ४० संच

२०/११/१७

C:\shekhar magar\२०१७\Letter २०१७.docx

परिशिष्ट-दोन - ब

महसूल व वन विभाग/फ-२

विषय:- विधान परिषद विनंती अर्ज समितीची बैठक (दि.२१.११.२०१७, दु.०३.००. वा.)
यवतमाळ जिल्ह्यात जलयुक्त शिवार योजनेची कामे यशस्वीरित्या राबविण्याबाबत

टिपणी

सर्वांसाठी पाणी टंचाईमुक्त महाराष्ट्र २०१९ अंतर्गत टंचाई परिस्थितीवर कायमस्वरुपी मात करण्यासाठी जलयुक्त शिवार अभियान योजना राबविण्यात येत आहे. सन २०१४-१५ या वर्षामध्ये वनविभागाचा या योजनेमध्ये समावेश करण्यात आलेला नव्हता. परंतु सदर योजने अंतर्गत माथा ते पायथा जल मृद संधारणाची कामे घेणे आवश्यक असल्याने जलसंधारण विभागाचे शासन शुध्दीपत्रक क्रमांक जलअ-२०१४/ प्र.क्र.२०३/जल-७,दिनांक २८ जानेवारी,२०१५ नुसार या योजनेमध्ये वनविभागाचा समावेश करण्यात आलेला आहे. तसेच वनविभागातील कामे करण्याकरीता १० (अ) या अभियानातंर्गत वन विभागाच्या कार्यक्षेत्रातील कामे संयुक्त वनव्यवस्थापन समिती/वन विभागामार्फत करावीत अशा स्पष्ट सुचना देण्यात आलेल्या आहेत.

यवतमाळ जिल्हयाअंतर्गत यवतमाळ, पांढरकवडा व पुसद वनविभागामार्फत सन २०१५-१६ करीता प्रस्तावित कामाचा आराखडा जिल्हाधिकारी, यवतमाळ यांना सादर करण्यात आला व मंजूर आराखडयानुसार यवतमाळ वनविभागात एकूण २१२ जल व मृद संधारणाच्या कामाचे, पांढरकवडा वनविभागातील एकूण ३३१ जल व मृद संधारणाच्या कामाचे व पुसद वनविभागातील एकूण १७६ जल व मृद संधारणाच्या कामाची असे एकूण ७१९ जल व मृद संधारणाच्या कामाची अंदाजपत्रके तयार करुन त्यास जिल्हाधिकारी, यवतमाळ यांचेकडून प्रशासकिय मंजूरी प्रदान करण्यात आलेली आहे. सन २०१५-१६ मध्ये प्रशासकिय मंजुरी प्राप्त झालेल्या कामाची माहीती खालीलप्रमाणे आहे.

अ. क्र.	जिल्हा	वनविभाग	एकूण प्रशासकीय मंजुरी प्राप्त कामे	ई निविदेनुसार कामाची रक्कम (रु.लाखात)	झालेली कामे	झालेला खर्च (रु.लाखात)
१	यवतमाळ	यवतमाळ	२१२	४११.९७	२१२	४११.९७
२		पांढरकवडा	३३१	७०३.०६	३३१	७०३.०६
३		पुसद	१७६	४२४.६७	१७६	४२४.६७
एकूण:-			७१९	१५३९.७०	७१९	१५३९.७०

वरिलप्रमाणे प्रशासकिय मंजूरी ही विलंबाने प्राप्त झाल्यामुळे सन २०१५-१६ मधील कामे सन २०१६-१७ मध्ये पुर्ण करण्यात आलेली आहे.

त्यानंतर सन २०१६-१७ मध्ये यवतमाळ वनविभागात एकूण ३४५ जल व मृद संधारणाच्या कामाचे, पांढरकवडा वनविभागातील एकूण २५१ जल व मृद संधारणाच्या कामाचे व पुसद वनविभागातील एकुण ४५३ जल व मृद संधारणाच्या कामाची असे एकूण १०१९ जल व मृद संधारणाच्या कामाची अंदाजपत्रके तयार करुन त्यास जिल्हाधिकारी, यवतमाळ यांचेकडून प्रशासकिय मंजूरी प्रदान करण्यात आलेली आहे. सन २०१६-१७ मध्ये प्रशासकिय मंजुरी प्राप्त झालेल्या कामाची माहीती खालीलप्रमाणे आहे.

अ. क्र.	जिल्हा	वनविभाग	एकूण प्रशासकीय मंजुरी प्राप्त कामे	ई निविदेनुसार कामाची रक्कम (रु.लाखात)	झालेली कामे	झालेला खर्च (रु.लाखात)
१.	यवतमाळ	यवतमाळ	३४५	५५५.८८	३४५	१८५.५१
२.		पांढरकवडा	२२१	४२५.६१	२२१	४२५.६१
३.		पुसद	४५३	५१८.५९	४५३	५१८.५९
		एकूण:-	१०१९	१५००.०८	१०१९	११२९.७१

वनविभागामार्फत ई-निविदा राबवितांना विभागीय स्तरावर ई-निविदा समिती स्थापन करुन मा.जिल्हाधिकारी यांचे आदेशानुसार कामाचे एकत्रिकरण करुन ३ लाखाच्या वरील रक्कमेच्या ई निविदा ऑनलाईन टाकण्यात आलेल्या आहेत. सदर निविदा उपसंचालक (माहिती), विभागीय माहिती अधिकारी, अमरावती यांच्याकडे प्रसिध्दी करीता पाठविण्यात आल्यात. निविदा उघडण्याच्या प्रक्रीयेमध्ये विभागीय कार्यालयस्तरावर स्थापन समिती समक्ष प्रथमत: तांत्रिक लिफाफा उघडण्यात येवून प्राप्त दस्तऐवज तपासणी करुन पात्र बिडर यांचे आर्थिक लिफाफा उघडण्यात येतो व त्यानुसार सर्वात कमी दर असलेल्या बिडर यांना समितीच्या शिफारसी करुन निविदा देण्यात आले आहेत. तसेच सन २०१६-१७ मधील पुर्ण करण्यात आलेल्या कामापैकी ८० टक्के कामाचे फोटोग्राफस जलयुक्त शिवार ॲपव्दारे MRSAC मधे अपलोड करण्यात आली आहेत.

वनविभागामार्फत जलयुक्त शिवार अभियान अंतर्गतची उपरोक्त कामे शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णय /सुचनाचे पालन करुन नियोजनबध्द पध्दतीने यशस्वीरित्या निर्धारीत वेळेत पुर्ण केलेली आहेत. त्यामुळे पाणीटंचाईवर कायमस्वरुपी मात होऊन भुगर्भातील जलसाठयी पातळी वाढविण्यास मदत झालेली आहे.

****

जनवृक्ष शिखर अभियानअंतर्गत वन २०१६-१७ मधील जल व वृक्ष लागवडीची कामे पूर्ण करण्याबाबत प्रगती अहवाल

अ. क्र.	वनवृत्त	जिल्हा	वनविभाग	लागवड जिल्हा अभियान अंतर्गत दिवट केलेली गावे	कवडसाळवी गावे	जिल्हा आराखड्या अनुसार				कामे						एकूण खर्च (लाखात)
						एकूण वृक्ष लागवड	लागवडीचे प्रकार	अपेक्षित उद्दिष्ट (लाखात)	लागवडीचे प्रकार	पूर्ण कामे	प्रगतीत खर्च (लाखात)	पूर्ण अपेक्षे ती कामे	कामाचे प्रकार	खर्चाचा खर्च (लाखात)		
१	२	३	४	५	६	७	८	९	१०	११	१२	१३	१४	१५	१६	१७
१	कवडसाळ	कवडसाळ	कवडसाळ	५८	४१	३४५	१) गावी लावलेल्या रोपांचा-१२ २) शाळा रोपवाटीका मा-०२ ३) लावलेल्या रोपांचा कालावधी - ० ४) पिंपळ बहाडा-०२ ५) शाळेत खोदलेले - ०३ ६) लागवड राहीली क्षेत्र-०२ ७) पाणीपुरवठा सोय-० ८) लागवड प्रतिक्षेत्रात-००	५५५.०८	३८६	५८५.५१	७	जल व वृक्ष संवर्धनाची कामे	०	५८५.५१
२	कवडसाळ	कवडसाळ	पुलगाव	५४	४३	३५३	१) गावी लावलेल्या रोपांचा-१५ २) लागवड राहीली क्षेत्र-०८ ३) पाणीपुरवठा सोय-११ ४) शाळा रोपवाटीका मा-०२ ५) पिंपळ बहाडा-००	५५३.८८	३८३	५१८.५९	०		०	५१८.५९
३	कवडसाळ	कवडसाळ	सोहर गाव	६३	४१	४१२	१) पंपळ बहाडा-०५ २) लागवड राहीली क्षेत्र-१३ ३) शाळा रोपवाटीका मा-०२ ४) कामाचे-०४ ५) पाणीपुरवठा सोय-०२ ६) लागवड प्रतिक्षेत्रात-००	४१२.००	३८५	४२५.५१	०		०	४२५.५१
	एकूण कवडसाळ जिल्हा			३२४	२२०	२४४१		१४१४.७६		१२७७	११४८.४४	७		०	११४९.४१

जलयुक्त शिवार अभियान-२०१५-१६ मधील जल व मृद संधारणाची कामे पूर्ण करण्याबाबत प्रगती अहवाल

अ. क्र.	जिल्हा	तालुका	गाव	जलयुक्त शिवार अभियानअंतर्गत निवड केलेली गावे	उपचारलायक गावे	निवडा आराखडा अनुसार				सद्यस्थिती						एकूण खर्च
						एकूण बंधारा कामे	कामाचे प्रकार	अंदाजित रक्कम (लाखात)	कामाचे प्रकार	पूर्ण कामे	प्रगतीत खर्च (लाखात)	सुरु असलेली कामे	कामाचे प्रकार	प्रगतीत खर्च (लाखात)	
१	२	३	४	५	६	७	८	९	१०	११	१२	१३	१४	१५	१६
१	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	१) [illegible] २) [illegible] ३) [illegible] ४) [illegible] ५) [illegible]	[illegible]	१) [illegible] २) [illegible] ३) [illegible] ४) [illegible] ५) [illegible]	[illegible]	[illegible]	-	जल व मृद संधारणाची कामे	-	[illegible]
२			[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	१) [illegible] २) [illegible] ३) [illegible] ४) [illegible] ५) [illegible] ६) [illegible] ७) Construction of water [illegible] ८) [illegible] ९) [illegible]	[illegible]	१) [illegible] २) [illegible] ३) [illegible] ४) [illegible] ५) [illegible] ६) [illegible] ७) Construction of water [illegible] ८) [illegible] ९) [illegible]	[illegible]	[illegible]	-		-	[illegible]
३			[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	१) [illegible] २) [illegible] ३) [illegible] ४) [illegible] ५) [illegible]	[illegible]	१) [illegible] २) [illegible] ३) [illegible] ४) [illegible] ५) [illegible]	[illegible]	[illegible]	-		-	[illegible]
	एकूण जलयुक्त शिवार			[illegible]	[illegible]	[illegible]		[illegible]		[illegible]	[illegible]	-		-	[illegible]

परिशिष्ट तीन

समितीच्या बैठका

पहिली बैठक

विधानपरिषद विनंती अर्ज समितीची बैठक मंगळवार, दिनांक ३ ऑक्टोबर २०१७ रोजी दुपारी २.३० वाजता. कक्ष क्र. ८०१, आठवा मजला, विधान भवन, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदरहू बैठकीस खालील सन्माननीय सदस्य व अधिकारी उपस्थित होते.

उपस्थिती :

(१) मा. माणिकराव ठाकरे, उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद तथा समिती प्रमुख.

विशेष निमंत्रित :

श्री. सुभाष झांबड, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) श्री. विलास आठवले उप सचिव.

(२) श्री. नितलेश भालेराव, कक्ष अधिकारी.

विभागीय अधिकारी महसूल व वन (वने) विभाग :-

(१) श्री. मनुकुमार श्रीवास्तव, प्रधान सचिव

(२) श्री. सु.वि. गावडे, सहसचिव, (भूसंपादन)

जिल्हाधिकारी कार्यालय :-

श्री.चंद्रकांत जाजू उपजिल्हाधिकारी, यवतमाळ.

समितीने विनंती अर्जाच्या संदर्भात विनंती अर्जदारांच्या तसेच विभागीय सचिव महसूल व वन (वने), उपजिल्हाधिकारी यवतमाळ व अन्य अधिका-यांच्या साक्षी नोंदविल्या.

दुसरी बैठक

विधानपरिषद विनंती अर्ज समितीची बैठक शुक्रवार, दिनांक, २३ फेब्रुवारी, २०१८ रोजी दुपारी १२.३० वाजता कक्ष क्र. ८०१, आठवा मजला, विधान भवन, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदरहू बैठकीस खालील सन्माननीय सदस्य व अधिकारी उपस्थित होते.

उपस्थितीः

(१) मा. माणिकराव ठाकरे, उपसभापती महाराष्ट्र विधानपरिषद तथा समिती प्रमुख.

(२) श्री. नागोराव गाणार, वि.प.स.

(३) श्री. शरद रणपिसे, वि.प.स.

विशेष निमंत्रितः

प्रा. जोगेंद्र.कवाडे, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) श्री. संजय कांबळे, अवर सचिव (समिती)

(२) श्री. नितलेश भालेराव, कक्ष अधिकारी.

विभागीय अधिकारी महसूल व वन (वने) :-

(१) श्री. विकास खारगे, सचिव,

(२) श्री. सु. वि. गावडे,.सह सचिव, (भूसंपादन)

जिल्हाधिकारी कार्यालयः-

(१) श्री. सुनिल महिंद्रकर, उपजिल्हाधिकारी, (भूसंपादन), नांदेड

(२) श्री.रमण जैन,उपजिल्हाधिकारी, (भूसंपादन), वर्धा.

समितीने विनंती अर्जाच्या संदर्भात विनंती अर्जदारांच्या तसेच विभागीय सचिव महसूल व वन (वने), उपजिल्हाधिकारी नांदेड, वर्धा व अन्य अधिका-यांच्या साक्षी नोंदविल्या.

तिसरी बैठक

विधानपरिषद विनंती अर्ज समितीची बैठक मंगळवार, दिनांक १७ जुलै, २०१८ रोजी सकाळी ११.३० वाजता कक्ष क्र. ०२, तळ मजला, मा. उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे दालन, विधान भवन, नागपूर येथे आयोजित करण्यात आली होती. सदरहू बैठकीस खालील सन्माननीय सदस्य व अधिकारी उपस्थित होते.

उपस्थितीः

(१) श्री. माणिकराव ठाकरे, माननीय उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, तथा समिती प्रमुख.

(२) श्री. नागोराव गाणार, वि.प.स.

(३) श्री. नरेंद्र पाटील, वि.प.स.

(४) श्री. शरद रणपिसे, वि.प.स.

विशेष निमंत्रितः

ॲड. रामहरी रूपनवर, वि.प.स.

ॲड. हुस्नबानू खलिफे, वि.प.स.

प्रा. जोगेंद्र कवाडे, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयः

(१) श्री. विलास आठवले, उप सचिव.

(२) श्री. नितलेश भालेराव, कक्ष अधिकारी.

सदर बैठकीत समितीने प्रारूप अहवालावर विचारविनिमय करून तो संमत केला.

शासकीय मुद्रणालय, नागपूर.